# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक
**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक-४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik-422004

EPABX: 0253- 2539100/300, Fax: 0253 - 2531836, Ph.: 2539214

**Email**: coe@muhs.ac.in, preexam@muhs.ac.in **Website**: www.muhs.ac.in

MUHS

डॉ. अजित गजानन पाठक
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),
परीक्षा नियंत्रक

**Dr. Ajit Gajanan Pathak**
M.B.B.S., M.D.(Forensic Medicine)
**Controller of Examinations**


जा.क्र. :मआविवि/एक्सपी/०८/२५७०/२०२० दि. ०९/०४/२०२०

## कार्यालयीन परीपत्रक

## तातडीचे

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य
विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/संस्था,
(पदवी व पदव्युत्तर)
मआविवि, नाशिक

विषय : विद्यापीठ उन्हाळी - २०२० (सत्र - ३) सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम *{पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रम व प्रथम वर्ष एम.बी.बी.एस.(२०१९) वगळून}* परीक्षेचे सुधारीत वेळापत्रकाबाबत...

संदर्भ : विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले परीपत्रक क्र. ७५/२०१९ दि. २८/११/२०१९

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयान्वये व संदर्भाधीन परीपत्रकान्वये विद्यापीठ परीपत्रक क्र. ७५/२०१९ दि. २८/११/२०१९ अन्वये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उन्हाळी -२०२० (फेज-१, फेज-२, फेज-३, फेज-४) च्या परीक्षांच्या संदर्भात Programme of Examiations आणि परीक्षा अर्ज सादर करावयाचे वेळापत्रक प्रसिध्द करण्यात आले आहे.

तथापि संपूर्ण जगभरात कोरोना (कोव्हिड-१९) विषाणूंच्या प्रादूर्भावामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून महाविद्यालयीन स्तरावरील यंत्रणा रुग्णसेवेमध्ये व्यस्त असल्याने सद्यस्थितीमध्ये विद्यार्थी व शिक्षकस्तरावर महाविद्यालयीन कार्य करण्यामध्ये अडचणी उत्पन्न होत आहेत.

करीता, मला प्राप्त आदेशान्वये, उन्हाळी-२०२० (सत्र-३) म्हणजे सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या *(पदव्युत्तर वैद्यकिय अभ्यासक्रम व प्रथम वर्ष एम.बी.बी.एस.(२०१९) वगळून)* विद्यापीठ परीक्षेचे वेळापत्रकाबाबत खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

- लेखी परीक्षा : दिनांक ०२/०६/२०२० ते २०/०६/२०२० रोजी आयोजित उन्हाळी-२०२० (सत्र-३) परीक्षा ही दि. १५/०६/२०२० नंतर घेणेबाबत विचाराधीन आहे. त्याअनुषंगाने सदर सत्र-३ परीक्षेचे अभ्यासक्रमनिहाय विस्तृत नविन वेळापत्रक दि. १५ एप्रिल, २०२० नंतर म्हणजे लॉकडाऊन कालावधी संपल्यानंतर विद्यापीठ संकेतस्थळावर जाहिर करण्यात येईल.

- प्रात्यक्षिक परीक्षा : अभ्यासक्रमनिहाय व महाविद्यालयनिहाय वेळापत्रक संबंधित महाविद्यालयास लेखी परीक्षेच्या दिनांकापूर्वी १५ दिवस अगोदर उपलब्ध केले जाईल.

- परीक्षा अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक : उन्हाळी - २०२० (सत्र-३) परीक्षेसाठी पात्र विद्यार्थ्यांची यादी ई-मेलद्वारे सादर करण्यासाठीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

| तपशिल | महाविद्यालयाने विद्यापीठास यादी ई-मेल करावयाचा दिनांक |
|---|---|
| विलंबशुल्का विरहीत | २६/०५/२०२० |

जे विद्यार्थी लॉकडाऊन मुळे परीक्षा अर्ज सादर करु शकत नसतील आणि सदर विद्यार्थी उन्हाळी -२०२० परीक्षेस पात्र असतील तर त्यांचे नांव विद्यापीठास सादर करावयाच्या यादीमध्ये समाविष्ठ करावे व नंतर सदर विद्यार्थ्यांकडून परीक्षा अर्ज भरुन घ्यावा. *विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्यासाठी लॉकडाऊन कालावधीमध्ये बोलावू नये व नाशिक येथे विद्यापीठात पाठवू नये.*

उपरोक्तप्रमाणे सर्व पात्र विद्यार्थ्यांची व ज्यांनी परीक्षा अर्ज सादर केलेले आहेत अशा विद्यार्थ्यांची एकत्रित यादी निम्न उल्लेखित नमुन्यात तयार करुन परीक्षा विभागाच्या ई-मेल आयडीवर दिनांक २६/०५/२०२० रोजी दुपारी ०१:०० वाजेपर्यंत पाठवावी. यादी फक्त ई-मेलद्वारेच पाठवावी.

नमुना (**Format**) :

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नांव | विषयनिहाय हजेरी (**%**) लेखी व प्रात्यक्षिक | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विषय-१ | विषय-२ | विषय-३ | विषय-४ | विषय-५ | विषय-६ |
| | | | | | | | |

सही व शिक्का : अधिष्ठाता/प्राचार्य

विद्याशाखानिहाय ई-मेल आयडी निम्न तक्त्यामध्ये दर्शविलेले आहे.

| अ. क्र. | पदवी विद्याशाखा | ई-मेल आयडी | अ. क्र. | पदव्यूत्तर विद्याशाखा | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय | ugexammedical@muhs.ac.in | ६ | वैद्यकिय | pgexammedical@muhs.ac.in |
| २ | दंत | ugexamdental@muhs.ac.in | ७ | दंत | pgexamdental@muhs.ac.in |
| ३ | आयुर्वेद/युनानी | ugexamayurved@muhs.ac.in | | | |
| ४ | होमिओपॅथी | ugexamhom@muhs.ac.in | ८ | तत्सम (नर्सिंग, भौतिकोपचार व व्यवमायोपचार | pgexamallied@muhs.ac.in |
| ५ | नर्सिंग<br>भौतिकोपचार/व्यवसायोपचार | ugexamnursing@muhs.ac.in<br>ugexamptot@muhs.ac.in | ९ | आयुर्वेद/युनानी व होमिओपॅथी | pgexamayurved@muhs.ac.in |

परीक्षा अर्ज विद्यापीठास स्वहस्ते केव्हा सादर करावयाचे याबाबतचे वेळापत्रक दि. २६/०५/२०२० नंतर जाहिर करण्यात येईल. वरील परीक्षेच्या वेळापत्रकातील बदलाबाबत सर्व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना सुचित करावे व आपल्या महाविद्यालयाच्या सूचनाफलकावर सदर परीपत्रकाला ठळक प्रसिध्दी देण्यात यावी.

परीक्षा नियंत्रक

प्रत :-
१) मा. कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक
२) मा. प्रति-कुलगरु कार्यालय, मआविवि, नाशिक
३) मा. कुलसचिव कार्यालय, मआविवि, नाशिक